# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०९/०१/२०१९

### मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०७

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १९/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा दि. १९/०१/२०१९ सभा सुचना क्र. ०७

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| १०४ | दि. २६/०७/२०१८, दि. ०४/०९/२०१८, दि. ०५/०९/२०१८ (दि. ०४/०९/२०१८ रोजीची तहकुब सभा) व दि. १९/१०/२०१८ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| १०५ | महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या लग्नाकरीता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक मदत देणेबाबत." (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. ०६/०९/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ८, ठराव क्र. ८) |
| १०६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखपरिक्षण विभाग यांचेकडील सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत. (मा. महासभा दि. १९/१०/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ९५) |
| १०७ | मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागात प्रशासकीय कामकाजाकरीता संगणक चालक तथा लिपीक बाहयमार्गाने (ठेका पध्दतीने) पुरवठा करणेबाबत. |
| १०८ | बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत स्थळांतरीत धारक व स्थळांतरीतरीतांना मनपा भाडे देत आहे अशा सदनिकाधारकांना एम.एम.आर.डी.ए. कडून सदनिका ताब्यात घेऊन त्यामध्ये त्यांना स्थळांतरीत करणेबाबत निर्णय घेणे. |
| १०९ | पुर्नविनियोजन करणेबाबत. |
| ११० | माहितीच्या अधिकाराअंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या अर्जांची माहिती घेऊन त्यावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका कायम स्वरुपी हस्तांतरीत करणेबाबत. |
| ११२ | शहरातील नागरीकांना शासनाच्या धोरणानुसार मोफत औषधोपचार देणेबाबत. |
| ११३ | मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र.213/2013 च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणा-या संगणक चालक/लघुलेखक यांना समान काम समान वेतन लागू करणेबाबत. |
| ११४ | सुधारित आकृतीबंधास मंजुरी देणेबाबत. |
| ११५ | सुधारित सेवाप्रवेश नियमास मंजुरी देणेबाबत. |
| ११६ | मुन्शी कम्पाऊन्ड येथे उर्दु शाळा सुरु करणेबाबत. |
| ११७ | महापालिका शाळेत पाच वर्षे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घ्यावयाचे असल्यास महापालिकेकडून अनुदान देणेबाबत. |
| ११८ | शहरातील झाडावर व इलेक्ट्रीक पोलवर असलेले केबल बाबत निर्णय घेणे. |
| ११९ | हिंदुह्दयसम्राट मा. श्री. बाळासाहेब ठाकरे कलादालन व स्व. प्रमोद महाजन यांच्या कलादालन बांधकामाचा आढावा घेवून त्वरीत सुरु करणेबाबत |
| १२० | उत्तन घनकचरा प्रकल्पातंर्गत मनपास करावयाच्या कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| १२१ | मा. महासभा दि. ०२/०३/२०१५, ठराव क्र. ६४ साठी फेरविचार होणेबाबत. |

| | |
|---|---|
| १२२ | चेणा येथील ठाणेकडे जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद रस्त्यापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. ९८ पर्यंतचा १८.०० मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| १२३ | मौजे मिरा, स.क्र. ८६पै. १२३पै. या जागेतील आ.क्र. ३५९ "मध्यवर्ती जकात नाका" हे आरक्षण वगळून (Municipal Purpose) महानगरपालिका उपयोग प्रयोजनार्थ करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२४ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विकास हक्क प्रमाणपत्राच्या अनषंगाने हस्तांतरीत होणाऱ्या आरक्षण क्षेत्रास कुंपणभिंत व मातीभराव करणे बाबत. |
| १२५ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वितरण व्यवस्थेतील वाणिज्य नळ जोडणीकरीता Ultrasonic AMR Meter पुरवठा उभारणी व चाचणी करणे व RF/GSM/LPWAN तंत्रज्ञानाद्वारे मिटर रिडींगची माहिती संकलीत करुन विश्लेशन करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| १२६ | शहरातील विविध पक्षाच्या अनधिकृत कार्यालयावर कार्यवाही करणेबाबत. |
| १२७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणे कामी नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १२८ | मनपा वाहनांची दुरुस्ती/देखभाल करणेकरीता वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १२९ | विविध वार्षिक दराच्या निविदा मागविणे कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| १३० | संत शिरोमणी सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविणेसाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत. |
| १३१ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ (मैदान) मधील जागेत फुटबॉल मैदान तयार करणेबाबत. |
| १३२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड विकसित करणेबाबत. |
| १३३ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत. |
| १३४ | हटकेश जंक्शन येथील नाला छेदून केसिंग पाईप एच.डी.डी. पध्दतीने टाकणे व ११५४ मि.मी., ९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे. |
| १३५ | आरक्षण क्र. २१७ मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले दवाखाना व मॅटरनिटी होम चालु करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे - |

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०९ जानेवारी, २०१९

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे ४०११०१
मा. महिला व बालकल्याण समिती
सभा दि :- ६/९/२०१८

प्रकरण - १०५ करिता - दि. १९/०७/२०१९

प्रकरण क्र.८ :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या लग्नाकरिता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरिता आर्थिक मदत देणेबाबत"

ठराव क्र. :- ८

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विधवा/घटस्फोटीत महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या महिलांना महिला व बालकल्याण विभागा मार्फत मुलींच्या विवाहाकरीता व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य करण्यात येते. परंतु सद्यस्थितीत करण्यात येत असलेली आर्थिक मदत महागाईचे काळात फार कमी आहे. त्यामुहे त्यात वाढ करण्याबाबत महिला व बालकल्याण समिती सभेने सभेस केलेल्या शिफारशी नुसार पुढील प्रमाणे या अंतर्गत मुलीच्या विवाहाकरीता रु.२१,०००/- (अक्षरी एकवीस हजार मात्र) व शिक्षणाकरीता खालीलप्रमाणे अर्थसहाय्य करण्यात येते.

| शैक्षणिक वर्ष | वार्षिक मदत रुपये |
|---|---|
| १ ते ५ | ७०००/- |
| ६ ते ८ | १०,०००/- |
| ९ ते १२ | १२,,०००/- |
| १२ ते पदवी | १५,०००/- |

- विधवा /घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहकरिता व शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याबाबत अटीशर्ती खालीलप्रमाणे
  १. अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी असणे आवश्यक असुन त्याबाबत पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल.
  २. मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
  ३. या योजनेखालील अनुदान फक्त मुलीच्या विवाहाकरिता अनुज्ञेय राहिल.
  ४. कुटुंबाचे मागील वर्षाचे उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल.
  ५. अर्जदाराच्या मुलीच विवाह निश्चित झाल्यानंतर अथवा विवाहनंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेले अर्ज ग्राहय समजण्यात येतील.
  ६. अर्जदार महिलेने पतीच्या निधनाबाबत मृत्यू दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
  ७. मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबत विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
  ८. सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरिता देण्यात येणार नाही.
  ९. मुलामुलींना शिष्यवृत्ती देण्याकरिता बोनाफाईड सर्टिफिकेट
  १०. शिधापत्रकाची सत्यप्रत (पिवळा किंवा केशरी)

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात "विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या लग्नाकरीता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक मदत" करणेकामी रु.८.०० लाख तरतुद करण्यात आलेली असून रु.७.०० लाख अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात "विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या लग्नाकरीता आर्थिक मदत व मुलांच्या शिक्षणाकरीता आर्थिक मदत" करणेकामी होणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे तसेच **अट क्र.** ४) कुटुंबाचे मागील वर्षाचे उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणेबाबतची अट शिथिल करणेबाबत मा.महासभेस शिफारस करीत आहे.

VBhavsar

**सूचक**
(वंदना भावसार)

DPArora

**अनुमोदन**
(दिपिका अरोरा)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Shanu Gohil
सभापती
महिला व बालकल्याण समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

या. महासभा दि. १९/०१/२०१९
प्रकरण क्र. १०६ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १९/१०/२०१८

//गोषवारा//

**प्रकरण क्र ९५ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग यांचे कडील सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरीक्षण अहवाल सादर करणे बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०१३-१४ व २०१४-१५ च्या वार्षिक लेख्याचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाकडुन पुर्ण झाले असुन संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरीक्षण अहवाल त्यांचेकडील पत्र क्र.स्था.१८/ब/मिरा. भाईंदर मनपा/लेपा/२०१३-१४/४९५ व २०१४-१५/४९२ दि.२४/११/२०१७ अन्वये मा. आयुक्ताकडे सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाच्या प्रती सचिव कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०७-अ अन्वये सन २०१३-१४ व २०१४-१५ या वितीय वर्षामधील लेखापरीक्षण अहवाल मा.महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
14/8/18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १८/०९ /2018

//गोषवारा//

प्रकरण क्र. १०७ मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागात प्रशासकीय कामकाजाकरीता संगणक चालक तथा लिपीक बाह्य मार्गाने (ठेका पदधतीने) पुरवठा करणेबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिका विविध विभागातील प्रशासकीय कामकाजासाठी ठेका पध्दतीने संगणक चालक तथा लिपीक उपलब्द करुन देण्याची जाहीर सुचना दि.14/07/2015 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहीर सुचनेनुसार मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांना मा. स्थायी समिती सभा दि.14/10/2015, ठराव क्र.95 अन्वये 03 वर्षा करीता निविदा मंजुर करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांना दि.26/10/2015 रोजी निविदा स्विकृती पत्र देण्यात आले आहे. व दि.02/12/2015 रोजीच्या आदेशान्वये सदर कामाच्या कंत्राटाची मुदत दि.03/12/2015 पासुन 03 वर्ष इतकी आहे. म्हणजेच मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांची कामाची दि.03/12/2015 ते 02/12/2018 इतकी आहे. व सदरची मुदत दि.02/12/2018 रोजी संपुष्टात येत आहे.

मिरा भाईदर महानगरपालिका विविध विभागातील प्रशासकीय कामकाजासाठी संगणक चालक तथा लिपीक कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे संबंधीत विभागप्रमुखांनी कळविले आहे. त्यामुळे संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन देण्याकरीता नव्याने निविदा मागविणे आवश्यक आहे.

सन 2018-19 या वार्षिक अंदाजपत्रकात अस्थायी आस्थापना (संगणक चालक) या लेखाशिर्षात सदर खर्चाबाबतची 350.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीमधुन आत्तापर्यत 186.02 लक्ष इतका खर्च झाला असुन 167.98 लक्ष इतकी तरतुद शिल्लक आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील प्रशासकीय कामकाजासाठी संगणक चालक तथा लिपीक ठेका पध्दतीने पुरवठा करणे आवश्यक असल्याने, पुढील 01 वर्षाकरीता पुरवठा करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.महासभेच्या मंजूरीसाठी सादर.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(विजयकुमार म्हसाळ)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०१/2018
## मिळकत विभाग
### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१११) :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य आवास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका कायम स्वरूपी हस्तातंरीत करणेबाबत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य आवास योजनेंतर्गत राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्यांची सेवा 25 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, अशा सफाई कामगारांना सेवा निवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधना नंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिकेकडून मालकी हक्काने अहस्तांतणीय स्वरूपात 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत वाटप करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : सकानि-2007/प्र.क्र.176/2007/नवि-06 दि.22 आक्टोबर 2008 अन्वये धोरण आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत 68 सफाई कामगारांना सुविधा क्षेत्र भूखंडावर बांधलेल्या सदनिका 2015 मध्ये वाटप करण्यात आल्या आहेत. सदर सदनिका ह्या मालकी तत्वावर मोफत दयावयाच्या आहेत. एका सदनिकेचा नोंदणीकृत करारनामा करण्यासाठी रू. 1,50,000/- (अक्षरी रूपये एक लक्ष पन्नास हजार मात्र) एवढा खर्च येणार असून सदर सदनिका ह्या मोफत दयावयाच्या असल्याने सर्व खर्च महानगरपालिकेने करण्याबाबत संबधितानी विनंती केलेली आहे. सदर विनंती विचारात घेता 50% खर्च महानगरपालिका 50% खर्च सफाई कामगाराने करावा असे धोरण निश्चित करण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

3/1/19

DIG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१/2019

## // गोषवारा //

## बांधकाम विभाग

**प्रकरण क्रमांक** ( १२० ) :- उत्तन घनकचरा प्रकल्पातंर्गत मनपास करावयाच्या कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथे घनकचरा प्रकल्पाचे काम सुरु आहे. त्याचप्रमाणे शहरात ठिकठिकाणी ओला कच-यावर प्रक्रीया करण्याचे प्रकल्प उभारणीसाठी निविदा प्रक्रीया सुरु आहे. उत्तन येथे सुक्या कच-यावर प्रक्रीया करण्याचे काम सुरु करण्यात आलेले असून ओल्या कच-यावर प्रक्रीया करणेसाठी बांधकाम व आवश्यक व्यवस्था करण्यात येत आहे. सदर प्रकल्पातंर्गत क्यूरींग सेक्शनचे बांधकाम महानगरपालिकेस करावयाचे असून आय.आय.टी., मुंबई यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार सदर कामासाठी सदर कामासाठी रु.5,64,67,700/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध आहे. तथापी सदर खर्च हा सन 2019-20 या वर्षात होणार असल्याने त्यासाठी पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करावी लागणार आहे. तथापी सदर प्रकल्पाचे कंत्राटदार मे. सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी सदर प्रकल्पाचे क्यूरींग शेडचे वाढीव काम स्वखर्चाने करून त्याऐवजी सदर प्रकल्प चालविण्याचा 2 वर्ष कालावधी वाढवून देण्याची मागणी केलेली आहे. सदर प्रस्ताव मान्य करण्यास अथवा प्रस्तावित कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2018-19/MG-2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 19/01/2018

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (929) - मा. महासभा, दि.02/03/2015, ठराव क्र. 64 साठी फेरविचार होणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मौजे गोडदेव, स.क्र.108, 109 व 118 या जागा खाजगी मालकीच्या असून सदरील जागा हि मंजूर विकास योजना आराखड्यानुसार रहिवास विभागात मोडते. भाईंदर (पूर्व) येथे कोणत्याही प्रकारचे आरक्षण किंवा खेळाचे मैदान नसल्याने उक्त नमुद जागेत 12.00 मी. रुंद रस्ता व सुमारे 6 ते 8 हजार चौ.मी. इतके क्षेत्र उद्यान / खेळाचे मैदानासाठी आरक्षित करणेकामी मा. महासभा दि.02/03/2015, प्रकरण क्र.57, ठराव क्र.64 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदल करण्याचे अधिकार व त्याकरीता सदर जागेतील प्रस्तावित नकाशाप्रमाणे आरक्षणाचे क्षेत्र निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो., यांना देण्यात आलेले आहेत.

त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर जागेतून 12.00 मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणेबाबत विकासक / अधिकारपत्र धारक मे. गुजरात इस्टेट यांना महानगरपालिकेच्या धोरणानुसार मोबदला देण्यात येईल असे दि.14/08/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

विकासक मे. गुजरात डेव्हलपर्स यांनी सर्व्हे क्र.108,109,118 या जागेतून 12.00 मी. रुंदीचा रस्ता व मार्केट विकसीत करणेकरीता महानगरपालिकेस जागा देण्याचे तत्वत: मान्य केलेले असून त्या अगोदर उर्वरीत जागेत इमारत बांधकामाचे नकाशे मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सबब जागा मालक / विकासक यांनी 12.00 मी. रुंदीचा रस्ता व मार्केटसाठी जागा देण्याची संमती दर्शविल्याने मा. महासभा दि.02/03/2015, प्रकरण क्र. 57, ठराव क्र.64 बाबत फेरविचार होणेसाठी मा. महासभेस सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
17/01/18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८ /०९ /2018

### // गोषवारा //

प्रकरण क्र. (९२२) :- चेना येथील ठाणेकडे जाणा-या 30.00 मी. रुंद रस्तयापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. 98 पर्यंतचा 18.00 मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये फेरबदल करणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसुचना टिपीएस-1296/847/सीआर-162/युडी-12 दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना क्र.टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12 दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासुन अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-1208/1346/प्रक्र.267/08/नवि-12 दि.21/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झालेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना येथील पाटीलपाडा व बेलकरीपाडा ही दोन आदिवांसी पाडे अस्तित्वात असून सदरील पाडयांस जाण्याकरीता पक्के रस्ते अजुनही उपलब्ध नाही. त्यामुळे तेथिल स्थानिक रहिवाश्यांना दैनंदिन कामकाजासाठी कच्चा रस्त्यावरुन चालत जावे लागते.

सद्यस्थितीत सदरील पाडयांकडे जाण्यासाठी स.क्र.147 मधील हॅरीटेज हॉटेलपासून स.क्र.119 पर्यंत नदीलगत 6.00 मी. रुंदीचा डांबरी रस्ता सार्वजनिक विभागामार्फत विकसीत करण्यात आलेला असूनसदरील रस्ता विकास योजनेत दर्शविलेला नाही. सदर रस्ता हा दोन्ही पाड्यांपर्यंत जात नसून अर्ध्यावरती संपुष्टात येत आहे. सबब हॉटेल हिल व्ह्यु पासून चेना नदीवरील जुन्या पुलापर्यंत 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता विकास योजनेत दर्शविलेला आहे. तथापि सदर भागातील पाटीलपाडा, बेलकरीपाडा व इतर रस्त्याकडे जाण्यासाठी खालीलप्रमाणे यासोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता प्रस्तावित करावयाचा आहे.

ठाणेकडे जाणा-या 30.00 मी. रुंद रस्त्यापासून नकाशामध्ये दर्शविलेल्या "अे" पर्यंत 12.00 मी. रुंदीचा रस्ता विकास योजनेमध्ये दर्शविलेला असून सदर रस्ता 18.00 मी. रुंद प्रस्तावित करावयाचा आहे.

"अे" ते "बी" पर्यंतचा रस्ता मंजूर विकास योजनेत 9.00 मी. रुंदीचा दर्शविलेला असून सदर रस्ता हा 18.00 मी. रुंदीचा प्रस्तावित करावयाचा आहे.

"बी" ते "सी" पर्यंतचा नदी ओलांडून नव्याने पूल बांधून 18.00 मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करावयाचा आहे.

"सी" ते "डी" पर्यंतचा रस्ता मंजूर विकास योजनेत 12.00 मी. रुंदीचा दर्शविलेला असून जागेवर विकसित झालेला नाही. सदर रस्ता 18.00 मी. रुंद प्रस्तावित करावयाचा आहे.

"डी" ते "ई" पर्यंत कच्च्या स्वरुपात वहिवाटीचा रस्ता उपलब्ध असून सदरील रस्ता 18.00 मी. रुंदीचा नदी ओलांडून एफ पर्यंत (मौजे चेणे, स.क्र. 98 पर्यंत) नव्याने प्रस्तावित करावयाचा आहे.

सबब वरीलप्रमाणे ठाणेकडे जाणा-या 30.00 मी. रुंद रस्त्यापासून स.क्र. 98 पर्यंत (यासोबतच्या नकाशामध्ये दर्शविलेल्या "एफ" पर्यंत) 18.00 मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०९/2018

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (क्र १२३) - मौजे मिरा, स.क्र.86पै., 123पै., 126पै., या जागेतील आ.क्र. 359 "मध्यवर्ती जकात नाका" हे आरक्षण वगळून (Municipal Purpose) महानगरपालिका उपयोग प्रयोजनार्थ करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेस मंजुरी मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत मौजे मिरा, स.क्र.86पै., 123पै., 126पै., हि जागा आ.क्र.359 "मध्यवर्ती जकात नाका" करीता आरक्षित आहे. आरक्षणाचे एकूण क्षेत्र 7100 चौ.मी. असून 2060 चौ.मी. युएलसी विभागामार्फत व 2566 चौ.मी. क्षेत्र विकास हक्क प्रमाणपत्राव्दारे असे एकूण 4626 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. सद्यस्थितीत जकात शासनामार्फत बंद झालेली असून आरक्षणाच्या जागेवर अनधिकृत बांधकामे झालेले आहेत. सबब सदर जागेच्या नागरी सोयी / सुविधा करिता वापर होण्याच्या दृष्टीने आरक्षणाचे नामाभिधान बदलणे आवश्यक झालेले आहे. सदर आरक्षणामध्ये फेरबदल करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने दि.23/08/2018 अन्वये विनंती केलेली आहे.

उपरोक्त आरक्षण हे महानगरपालिकेच्या प्रवेशव्दारावर असून 45.0 मी. रूंद विकास योजना रस्ता (काशिमीरा रोड) लगत आहे. आरक्षणाच्या लगतचे विकास योजना रस्ते विकसीत आहेत. यास्तव सदर आरक्षणाच्या नामाभिधानात बदल करून "महानगरपालिका उपयोग प्रयोजनार्थ" (Municipal Purpose) याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेकामी निर्णय होणेसाठीचा अहवाल मा. महासभेस सादर.

(बालाजी खतगांवकर) 6/9/18
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९ /०९ /2018

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (१२४) - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विकास हक्क प्रमाणपत्राच्या अनुषंगाने हस्तांतरित होणाऱ्या आरक्षण क्षेत्रास कुंपणभिंत व मातीभराव करणे बाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम 33 परिच्छेद 4 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मंजूर विकास योजनेमधील विविध आरक्षणे व विकास योजना रस्ते यांच्या मोबदल्यात खाजगी जागामालकास / भाडेपट्टेधारकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद आहे.

सदर विनियमामधील नियम क्र.15 नुसार आरक्षणाखालील जागा संबंधित जागामालक / भाडेपट्टेधारक यांचेकडून हस्तांतरीत करणेकरीता सदरच्या जागेस सभोवतालच्या जमीन पातळीपासून मातीभरावासह कुंपणभिंत बांधून उपरोक्त जागा महानगरपालिकेस हस्तांतरण करुन घेणे आवश्यक आहे.

आरक्षणाखालील जागा / विकास योजना रस्त्याखालील जागा या महानगरपालिकेस जागामालक / भाडेपट्टेधारक यांचेकडून टप्प्याटप्प्याने मालकी हक्कानुसार हस्तांतरित होत असतात. बहुतांश वेळा आरक्षणाखालील आरक्षण हद्दीमधील एकूण भुखंडांपैकी काही भुखंड महानगरपालिकेस हस्तांतरित होत असतात.

अश्या टप्प्याटप्पयाने हस्तांतरित होणाऱ्या खाजगी भुखंडास भुखंड निहाय माती भराव व कुंपणभिंत घालणे शक्य नसते. त्यामुळे एखादे आरक्षण हे एकसंघ विकसित करणेच्या अनुषंगाने विकास हक्क प्रमाणपत्र प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही वेळी संबंधित जागामालक / भाडेपट्टेधारक यांचेकडून महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर करणेत आलेल्या दरानुसार माती भराव शुल्क व कुंपणभिंत शुल्क आकारण्यात यापूर्वी आकारण्यात येत होते. जेणेकरुन एखाद्या आरक्षणा खालील सर्व जागा महानगरपालिकेस हस्तांतरित झाल्यानंतर सदर आरक्षणास माती भराव व कुंपणभिंत घालणे करीता उपरोक्त शुल्काचा वापर करणेत येत होता.

विकास हक्क प्रमाणपत्राबाबत मा. शासनाने दि.29/01/2016 रोजी सुधारीत नियम मंजूर केलेले आहेत.

सदर नियमावलीतील नियम क्र.4.1.2 नुसार हस्तांतरीत होणाऱ्या आरक्षणा खालील जागेकरीता सभोगवतालच्या परिसरातील जमिन पातळीनुसार माती भराव व कुंपणभिंत संबधित जागा मालक / भाडेपट्टाधारक यांचेकडून घालून (गेटसह) तद्नंतरच संबंधितांस विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करणेबाबत नमुद केलेले आहे.

नवीन शासन निर्णयानुसार टप्प्या-टप्प्यानुसार महानगरपालिकेस हस्तांतरीत होणा-या आरक्षणाखालील जागा संबंधीत जागामालक / भोगवटाधारक हे त्यांचे मालकी निहाय मातीभराव व कुंपणभिंत करुन हस्तांतरीत करित असून त्याप्रमाणे विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करणेत येते.

तथापि सदर आरक्षण एकसंघपणे महानगरपालिकेमार्फत विकसीत करतेवेळी आरक्षणातील वेगवेगळ्या जागासाठी केलेले कुंपणभिंतीचे बांधकाम तोडावे लागणार असून आरक्षणाच्या हद्दीवर नव्याने कुंपणभिंत बांधावी लागणार आहे. म्हणजेच केलेले कुंपणभिंतीचे बांधकाम तोडणेसाठी व नव्याने बांधणेसाठी महानगरपालिकेचा निधी खर्च होणार आहे.

याव्यतिरिक्त दि.29/01/2016 मधील नियमावलीमधील नियम क्र.4.1.1 मध्ये शासनाने दि.14/03/2017 रोजी केलेल्या बदलानुसार CRZ ने बाधीत क्षेत्रातील आरक्षणास देय क्षेत्राच्या 50% इतके विकास हक्क प्रमाणपत्र देणेबाबत नमुद केले असून सदर जागेमध्ये भरणी व कुंपणभिंतीसाठी शासनाच्या MCZMA प्राधिकरणाकडील पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. परिणामी अश्या स्वरुपाच्या जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेस विलंब होत आहे.

सबब वरीलप्रमाणेच्या विकास हक्क प्रमाणपत्र प्रस्तावाच्या प्रकरणात कार्यवाही करीता खालीलप्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

1) मंजूर विकास योजनेमधील आरक्षणाखालील क्षेत्रास संबंधीत जागामालक / भाडेपट्टाधारक यांचेकडून मातीभराव करुन घेऊन कुंपणभिंती बांधकामासाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त दराप्रमाणे शुल्क आकारुन घेणे.
2) मंजूर विकास योजनेमधील सी.आर.झेड. ने बाधीत आरक्षणाखालील क्षेत्रास संबंधीत जागामालक / भाडेपट्टाधारक यांचेकडून माती भराव व कुंपणभिंत बांधकामाबाबत महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त दराप्रमाणे शुल्क आकारुन घेणे.

सबब सदर प्रकरणी निर्णय होणेसाठीचा अहवाल मा. महासभेस सादर.

गोषवारा प्राप्त दि 07/12/2018 वेळ 2.09

मा. ~~स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवार नोंद

रजिस्टर अ. क्र ....06..... वर्ष :- 2018

(signature)

निरीक्षक

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

(signature)

(बालाजी खतगांवकर)

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

6/4/18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१९

## // गोषवारा //

**प्रकरण क्र** (१२५) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वितरण व्यवस्थेतील वाणिज्य नळ जोडणीकरीता Ultrasonic AMR Meter पुरवठा उभारणी व चाचणीकरणे व RF/GSM/LPWAN तंत्रज्ञानाद्वारे मिटर रिडींगची माहिती संकलीत करुन विश्लेशण करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिसरात दररोज एकूण १७८ द.ल.ली. पाणी पुरवठा वितरीत केला जातो. या करीता ग्राहकांपर्यंत १/२", ३/४", १", १½", २" आकाराच्या नळ जोडणीद्वारे पाणी वितरीत करण्यात येते मिरा भाईंदर शहरात उपरोक्त आकाराच्या घरगुती व वाणिज्य स्वरुपाच्या एकूण ३९५६५ नळ जोडण्या आहेत. त्यापैकी घरगुती स्वरुपाच्या ३६६३७ व वाणिज्य स्वरुपाच्या २९२८ नळ जोडण्या आहेत.

सद्यस्थितीत ग्राहकांना नळ जोडणीवर यांत्रिकी मिटरद्वारे पाणी मोजून पाणी देयके तयार करण्यात येतात. यांत्रिकी मिटर मध्ये Moving parts जास्त असल्याने मिटरची पाणी मोजण्याची अचूकता कमी असते. त्यामुळे प्रत्यक्षात वितरीत केलेल्या पाण्यापेक्षा कमी पाण्याचे मोजमाप होऊन महसुली उत्पन्नात घट संभावते. तसेच यांत्रिकी मिटरमध्ये Moving parts जास्त असल्याने वांरवार दुरुस्ती उदभवण्याचे प्रमाण जास्त आहे. सदर मीटर दुरुस्तीच्या कालावधीत पाणी देयके सरासरी पध्दतीने करण्यात येते या कारणास्तवही महसुली उत्पन्नात घट येण्याची शक्यता असते. यामुळे स्टेम व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तर्फे घेण्यात येणारे एकूण पाणी व प्रत्यक्षात वितरीत झालेले पाणी याचा ताळमेळ घालणे कठीण होते.

या करीता बाजारात सद्या अद्यावत तंत्रज्ञानावर आधारीत उपलब्ध असलेले Ultrasonic AMR मिटर बसविण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे. सदर मिटरस् Ultrasonic तंत्राद्वारे पाणी मोजणी करतात तसेच RF/GSM/LPWAN तंत्रज्ञाद्वारे वेळोवेळी मिटरद्वारे मोजण्यात येत असलेल्या पाण्याच्या तपशिल जसे Quantity, Velocity व इतर अनेक तांत्रिक तपशील Control Room मधील Server ला पाठवत असतात. सदर तांत्रिक तपशीलाची विविध Formats द्वारे तपासणी व विश्लेशण करुन ग्राहक कशाप्रकारे पाण्याचा वापर करीत आहे याची नोंद ठेवणे शक्य होते. सदर मिटरस्मध्ये Moving parts नसल्याने त्याची पाणी मोजण्याची अचूकता व कार्यक्षमता उत्तम प्रकारची असते. तसेच मिटरस् बिघडण्याचे प्रमाणही अत्यल्प असते. या कारणास्तव पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत याद्वारे महसुली उत्पन्नात वाढ करणे शक्य होईल.

वितरण व्यवस्थेतील एकूण ३९५६५ नळ जोडण्यांपैकी वाणिज्य स्वरुपाच्या २९२८ नळजोडण्यांना उपरोक्त अद्ययावत तंत्रज्ञानाचे मिटरस् बसवून प्रायोगिक तत्वावर प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावीत आहे. याकरीता या क्षेत्रातील नामवंत अभिकर्त्यांकडून दर पत्रके प्राप्त करुन एकूण २९२८ नळजोडण्यावर विविध आकाराचे Ultrasonic AMR मिटरस् बसविण्याचा रु. ५,३८,३८,९३०/- रक्कमेचा अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्याचा एकूण खर्च वाणिज्य नळजोडण्याच्या २९२८ ग्राहकांवर जोडणीच्या आकारानुसार विभागण्याचे प्रस्तावीत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्तावास मंजूरी दिल्यास अंदाजपत्रकीय प्रस्तावानुसार ई-निविदा मागवून मिटरसूचा पुरवठा करण्याकरीता दर निश्चित करण्याचे प्रस्तावीत आहे. सदर निश्चित केलेल्या दरानुसार वाणिज्य ग्राहकांने मिरा भाईंदर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठेकेदाराकडून मंजूर केलेल्या दराने मिटरस् घेऊन तपासणी करुन उभारणी करुन घ्यावी असे प्रस्तावीत आहे. मिटर टेस्टींग नामांकित संस्थेकडून/प्रयोगशाळेकडून करुन घेऊन तसे प्रमाणपत्र ग्राहकांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेस दयावे. तसेच भविष्यात मिटरस् मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास दुरुस्त करण्याची जबाबदारी तीन वर्षापर्यंत ठेकेदाराची राहील. तसेच भविष्यात मिटरस् नवीन घेण्याची आवश्यकता असल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठेकेदाराकडून निविदेतील मंजूर दराप्रमाणे घ्यावे असे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

तरी, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वितरण व्यवस्थेतील २९२८ वाणिज्य नळ जोडणीकरीता Ultrasonic AMR पुरवठा उभारणी व चाचणीकरणे व RF/GSM/LPWAN तंत्रज्ञानाद्वारे मिटर रिडींगची माहिती संकलीत करुन विश्लेषण करण्याच्या रु. ५,३८,३८,९३०/- रक्कमेच्या अंदाजपत्रकीय प्रस्तावानुसार ई-निविदा मागवून ठेकेदार निश्चित करण्याच्या प्रस्तावास मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. १२/१२/२०१८ वेळ ९:०५
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ...८० ... वर्ष :- २०१८/१९

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

INSURM/P/P/WS/OOSHAVARA/5

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १९/०७/२०१८

## अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र :-** १२६

**विषय :- शहरातील विविध पक्षाच्या अनधिकृत कार्यालयावर कार्यवाही करणेबाबत.**

मा. विशेष महासभा दि. ०३/११/२०१८, प्रकरण क्र. १०३, ठराव क्र. १०२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत असलेले विविध राजकिय पक्षांचे अनधिकृत कार्यालयावर कारवाई करणेबाबत प्रशासनाने सविस्तर माहिती घेऊन विषय पुढील सभेत सादर करावा असा ठराव पारित केलेला आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत असलेले विविध राजकिय पक्षांचे अनधिकृत कार्यालयावर कारवाई करणेबाबत अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडून सर्व प्रभाग अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या हद्दीतील विविध राजकिय पक्षाच्या अनधिकृत कार्यालयाची प्रभागनिहाय अदयावत माहिती मागविण्यात आलेली आहे ती खालील प्रमाणे.

**प्रभाग क्र. ०१**

| अ.क्र. | पक्ष कार्यालयाचे पत्ता | पक्ष कार्यालयाचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शिवसेना शाखा, मोर्वा | रस्त्यालगत | कर आकारणी करण्यात आलेली आहे. |
| २ | शिवसेना शाखा, मुर्धा | रस्त्यालगत | कर आकारणी करण्यात आलेली आहे. |
| ३ | शिवसेना शाखा, राई | रस्त्यालगत | कर आकारणी करण्यात आलेली आहे. |
| ४ | शिवसेना शाखा, उत्तन नाका | रस्त्यालगत | कर आकारणी करण्यात आलेली आहे. |
| ५ | शिवसेना शाखा, गिता नगर, भाईंदर (प.) | गटारालगत | कर आकारणी करण्यात आलेली नाही. |

**प्रभाग क्र. ०२**

| अ.क्र. | पक्ष कार्यालय | पक्ष कार्यालयाचे पत्ता |
|---|---|---|
| १ | शिवसेना कार्यालय, जागा खाजगी | मिरा भाईंदर महानगरपालिका, प्रभाग कार्यालय क्र. १च्या समोर राम मंदिर मार्ग व छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) यांच्या मध्ये भाईंदर (प.) |
| २ | काँगेस कार्यालय, जागा खाजगी | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर देवचंद नगर,कडे जाणाऱ्या नाक्यासमोर सिद्धीविनायक इमारतीच्या बाजुला, भाईंदर (प.) |
| ३ | शिवसेना कार्यालय, मिठ विभाग | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग स्टेशन रोड मिठागर जागेवर भाईंदर (प.) |

## प्रभाग क्र. ०३

| अ.क्र | राजकिय पक्षाचे कार्यालय ठिकाण | पक्षाचे / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | भाईंदर<br>रेल्वे स्टेशन सबवे जवळ, भाईंदर पूर्व | शिवसेना |

| अ.क्र | वाचनालयाचे ठिकाण | पक्षाचे / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | सरस्वती पार्क १ बिल्डीग समोर, एस. व्ही. रोड, भाईंदर पूर्व | भारतीय जनता पार्टी |
| २ | ओसवाल पार्क समोर, चंदन पार्क, भाईंदर पूर्व | आदर्श सेवा भावी संस्था |
| ३ | नर्मदा नगर, स्टोर मनोहर बिल्डीग, भाईंदर पूर्व | साई संतोष सेवा ट्रस्ट |
| ४ | हनुमान मंदिर, नवघर नाका, भाईंदर पूर्व | शिवसेना |
| ५ | केबिन रोड, पदचारी पुला लगत, भाईदर पूर्व | शिवसेना |
| ६ | विद्यासागर शाळेजवळ, नवघर रोड, भाईंदर पूर्व | शिवसेना |
| ७ | शिवशक्ती नगर, मनपा पाण्याच्या टाकी जवळ, नवघर, भाईंदर पूर्व | शिवप्रेमी गृप नवघर |
| ८ | राहुल पार्क, जय शिव पूजा बिल्डिग जवळ, भाईंदर पूर्व | भारतीय जनता पार्टी |
| ९ | कस्तुरी पार्क, मदरमेरी शाळे जवळ, भाईंदर पूर्व | शिवसेना |

## प्रभाग क्र. ०४

| अ.क्र. | राजकिय पक्ष कार्यालयाचे नाव | ठिकाण | कार्यालयाचे मोजमाप |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी, कनकिया मंडळ | महापौर बंगलो समोर बेवर्ली पार्क मिरा रोड पुर्व | १० X १५ चौ. फुट |
| २ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | हरीया ड्रीम पार्क अशोक हॉटेल मागे हटकेश मिरा रोड पुर्व | ३० X ०५ चौ. फुट |
| ३ | शिवसेना | हटकेश चौक मिरा रोड पुर्व | १५ X १५ चौ. फुट |
| ४ | भारतीय जनता पार्टी कार्यालय, | घोडबंदर गावात जाणाऱ्या रस्त्यावरील बस स्टॉपच्या बाजुला घेडबंदर | १५ X २० चौ. फुट |
| ५ | भारतीय जनता पार्टी कार्यालय, | कनकिया पोलीस चौकी रोड मिरा रोड पुर्व | १५ X १५ चौ. फुट |
| ६ | शिवसेना पक्ष कार्यालय | पुनम गार्डन रोड, मिरा रोड पुर्व | ३० X १५ चौ. फुट |
| ७ | शिवसेना पक्षाचे वाचनालय, संख्या-०२ | कनकिया रोड मनमंदिर समोर मिरा रोड पुर्व | १० X ०५ चौ. फुट<br>१० X ०५ चौ. फुट |
| ८ | महाराष्ट्र नवनिर्माझ सेनाचे वाचनालय | सुंदर दर्शन अपा. जवळ पुनम गाडन जवळ, मिरा रोड पुर्व | ०८ X १० चौ. फुट |
| ९ | भरतीय जनता पार्टी पक्षाचे वाचनालय | आरक्षण क्र. २६१ कनकिया मिरा रोड पुर्व | १५ X ०७ चौ. फुट |

## प्रभाग क्र. ०५

| अ.क्र. | पक्षाचे नाव | ठिकाण | कार्यालयाचे मोजमाप |
|---|---|---|---|
| १ | शिवसेना जनसंपर्क कार्यालय, शांती नगर सेक्टर ५, (कंटेनर) | | |

## प्रभाग कार्यालय क्र. ०६

| अ.क्र. | पक्षाचे नाव | मोजमाप | मोजमाप | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सहयोग व्यापारी सामाजिक संस्था मोफत वाचनालय, भारती पार्क, बिल्डींग समोर, मनि पॅलेस हॉटेलच्या मागे | शेड | ५ X ३ मिटर | |
| २ | शिवसेना कार्यालय, गोकुळ व्हिलेज समोर, शांती पार्क, (आर.जी. जागेत) | पक्या स्वरुपाचे बांधकाम | १० X १५ मिटर | |
| ३ | काँगेस कार्यालय, गोकुळ व्हिलेज समोर, शांती पार्क, (आर.जी. जागेत) | पक्या स्वरुपाचे बांधकाम | १० X १५ मिटर | |
| ४ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, राजु वाघमारे, मुन्शी कंम्पाऊंड | आर.पी.आय ऑफीस | ३ X ३ मिटर | |
| ५ | वाचनालय, पांडुरंगवाडी | ताडपत्री/शेड | ३ X २ मिटर | |
| ६ | रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया | मोफत वाचनालय, पांडुरंगवाडी | ३ X ४ मिटर | |
| ७ | शिवसेना पक्ष कार्यालय, पांडुरंगवाडी, सहयोग सो. | मोफत वाचनालय, लोखंडी अँगल व पत्राशेड | ४ X ३ | |
| ८ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया, लोढा कॉम्पलेक्सजवळ, राष्ट्रीय महामार्ग | मोफत वाचनालय, लोढा कॉम्पलेक्स, राष्ट्रीय महामार्ग जवळ | १० X ३ मिटर | |
| ९ | जेष्ठ नागरीक कट्टा मोफत वाचनालय, पेणकरपाडा | पत्रा व लोखंडी अँगलचे शेड | ३ X ६ मिटर | |
| १० | शिवसेना जेष्ठ नागरीक कट्टा मोफत वाचनालय, पेणकरपाडा | ऍंगलचे शेड | ३ X ६ मिटर | |
| ११ | अनंतची विभुषित जगदगुरु श्री. रामनंदाचार्य, श्री. स्वामी नरेंद्रचार्य श्री. महाराज वाचनालय | पत्राशेड, पेणकरपाडा | ४ X ५ मिटर | |
| १२ | आर.पी.आय. एम.आय.डी.सी. राष्ट्रीय महामार्गलगत, मोफत वाचनालय, परशुराम साळवी | पत्राशेड | ३ X ६ मिटर | |
| १३ | शकुंतला बौध्द विकास ट्रस्ट मोफत वाचनालय, मांडवीपाडा, सेंट झेविअर्स स्कुलच्या समोर, मोकळ्या जागेत | ऍंगल पत्राच्या बनविलेले शेड | ३ X ४ मिटर | |
| १४ | बौध्द संस्था वाचनालय, ग्रिन व्हिलेज बिल्डींग | पत्राशेड | ३ X ४ मिटर | |

| अ.क्र. | पक्षाचे नाव | मोजमाप | मोजमाप | शेरा |
|---|---|---|---|---|
| | समोर, मांडवीपाडा | | | |
| १५ | भारतीय जनता पार्टी, वाचनालय, ग्रिन व्हिलेज बिल्डींग समोर, मांडवीपाडा | पत्राशेड | ३ X ४ मिटर | |
| १६ | बहुजन समाज पार्टी, भिम गर्जना हॉकर्स, बहु उद्देशीय संस्था, बालम्मताई अ. बज्जी, जनता नगर, मानसी, क्लासीक बिल्डींगच्या बाजुला | चौथरा/झेंडा, बहुजन समाज पार्टी | | |
| १७ | शिवसेना पक्ष कार्यालय, गौरव गेलेक्सी लगत, नित्यानंद नगर, मिरा रोड (पू). | पत्राशेड | ३ X ४ मिटर | |
| १८ | भारतीय जनता पार्टी जन संपर्क कार्यालय, काजपाडा बस स्टॉप बाजुला | पत्राशेड | ३ X ४ मिटर | |

सबब, वरील राजकिय पक्षाची अनधिकृत कार्यालयाची यादी प्रभाग कार्यालय क्र. ०१ ते ०६ यांच्याकडून प्राप्त झालेली असून वरील प्रमाणे प्राप्त यादीनुसार विविध पक्षांच्या अनधिकृत कार्यालयावर कारवाई करणेकामी मा.महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(दिपक पुजारी)
उपायुक्त(अतिक्रमण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१
दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

## // गोषवारा //

**मा. महासभा दि. १९ / ०१ /२०१८**

**प्रकरण क्र :-१२८ मिरा भाईंदर महापालिकेकरिता वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा)भाडयाने घेणे कामी नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकीची एकुण ६६ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा. सामान्य प्रशासन, आरोग्य विभाग, वैदयकिय आरोग्य विभाग, अग्नीशमन विभाग, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग, मालमत्ता कर विभाग, पाणीपुरवठा विभाग इ. विभागांमध्ये कार्यरत आहेत. सदरची वाहने अपुरी पडत असल्याने महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकसह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणेकामी वार्षिक निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेची मुदत दि. २८/०६/२०१८ रोजी संपूष्टात येत आहे. सदरची मुदत संपण्यापूर्वी नविन निविदा मागविणे आवश्यक असल्याने सदरची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापी भारत निर्वाचन आयोग कोकण पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता असल्याने सदर निविदेस मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आचारसंहितेनंतर दि. १६/०८/२०१८ रोजी पहिली स्थायी समिती सभा घेण्यात आली. सदर सभेत ठराव क्र. ४६ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यात आली. व त्यानुसार निविदा प्रसिध्दी बाबत विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. मा. आयुक्त सो. यांच्या परिपत्रकानुसार "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३" मधील तरतुदीनुसार २.०० कोटी रक्कमेपर्यंतचे कामाचे आर्थिक व प्रशासकिय मान्यतेचे अधिकार मा. महासभेकडे असल्याने सदरचा विषय महासभेपुढे ठेवणेबाबत कळविले आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खाजगी गाडया भाडयाने घेणे या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेनुसार नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने घेणे कामी निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
15/10

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.महासभा**
**दि.** १९/०७/२०१८

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.** ७२८ **:- मनपा वाहनांची दुरुस्ती/देखभाल करणेकरीता वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सामान्य प्रशासन, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य विभाग, अग्नीशमन विभाग,पाणी पुरवठा विभाग, इ.आपत्कालीन व्यवस्थापन इ. विभागातील वाहने ही अत्यावश्यक सेवेतील वाहने तात्काळ दुरुस्ती करुन कार्यान्वयीत करणे करीता नागरीक, समाजसेवक,नगरसेवक, पदाधिकारी हे पाठपुरावा करीत असतात. वाहन देखभाल दुरुस्ती करीता वार्षिक निविदा मंजुर नाही. करीता वाहन नादुरुस्त झाल्यास वेळोवेळी दरपत्रके काढुन दुरुस्ती करावी लागते. दरपत्रके काढुन दुरुस्ती करणेच्या प्रक्रियेला अवधी लागत असुन अत्यावश्यक सेवेतील वाहने तात्काळ दुरुस्ती करुन नागरीकांच्या सेवेत आणणे शक्य होत नाही. त्यामुळे पदाधिकारी, नगरसेवक, समाजसेवक, नागरीक हे नाराजी व्यक्त करीत असतात.

तरी महानगरपालिकेच्या मालकिच्या वाहनांना लागणारे स्पेअरपार्ट पुरवठा करुन वाहनांची दुरुस्ती करण्याकरिता सन २०१८-१९ या चालु आर्थिक वर्षा करिता वार्षिक निविदा मागवून ठेका निश्चित करणे गरजेचे आहे. शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३-प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये महापालिका वाहन देखभाल दुरुस्ती वरील खर्च मंजुर तरतुदीनुसार करण्यात यावा. तसेच इंधन खर्चाची मर्यादा पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनासाठी प्रतीवर्षी एका वाहनास रु.५०,०००/- व डिझेलवर चालणाऱ्या वाहनासाठी प्रतीवर्षी एका वाहनास रु.६०,०००/- इतकी ठरवुन दिलेली आहे. परंतु महानगरपालिकेच्या वाहनांचे वाढते आयुष्य लक्षात घेता तसेच अत्यावश्यक विभागामध्ये कार्यरत असलेल्या वाहनांची दुरुस्ती व इंधन खर्च लक्षात घेता शासन निर्णयाच्या मर्यादेत राहुन इंधनाचा खर्च करणे अशक्य होणार आहे. सन २०१८-१९ मध्ये सदर कामी खालील प्रमाणे लेखाशिर्षानिहाय तरतुद करण्यात आलेली आहे

| अ. क्र. | विभाग | वाहनाचा प्रकार | वाहनाची संख्या | इंधन दुरुस्तीकरिता ठेवण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतुद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सामान्य प्रशासन | कार | १२ | ४५,००,०००/- |
| २ | अग्निशमन | अग्निशमन बंब, टँकर, मोबाईल जीप.(डिजेल) | २० | २५,००,०००/- |
| ३ | वैद्यकिय आरोग्य विभाग | रूग्णवाहिका, शववाहिनी, ॲपेपीयागो, | २२ | १५,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | महिंद्रा मॅक्सीमो, महिंद्रा पिकअप, कार्डिक आयसीयू व्हॅन, | | |
| ४ | आरोग्य विभाग | सक्शन मशिन (डिजेल) | १ | १०,००,०००/- |
| ५ | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग. | मोबाईल जीप, हायड्रोलिक शिडी, ट्रॅक्टर (डिजेल) | ११ | - |
| **एकुण** | | | **६६** | **९५,००,०००/-** |

| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | | | | | | | अधिकारी या पदाचा अनुभव आवश्यक असलेले पद आस्थापनेवर मंजुर नसुन सहा. उदयान अधिक्षक व उदयान अधिक्षक या पदानामाची पदे मंजुर आहेत. त्यामुळे उदयान अधिक्षक या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी पदोन्नती पासुन वंचित राहत आहेत. त्यामुळे श्रेणी, पदनाम तसेच शैक्षणिक अर्हता व पात्रतेत बदल करणे आवश्यक आहे. |
| 56. | श्रेणी- 2 उदयान सेवा | सहा. वृक्ष संवर्धन व उदयान अधिकारी | नामनिर्देशन | 40 वर्षे | मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/मान्यता प्राप्त विद्यापीठाची | श्रेणी- 3 उदयान सेवा | सहाय्यक उदयान अधिक्षक/ उदयान | नामनिर्देशन (सरळसेवा) | 38 वर्षे | शासन शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी | मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक वृक्ष |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | | अधिक्षक | | | परीक्षा उत्तीर्ण. | संवर्धन व उद्यान अधिकारी हे पद मंजुर नसुन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- मिभाप-१११४/२५/प्र.क्र.०३/२०१४ नवि-२८ दि.२१ मे, २०१४ नुसार सहाय्यक उदयान अधिक्षक श्रेणी-03, असे पदनाम असलेले पद मंजुर आहे. तसेच उद्यान अधीक्षक श्रेणी-03 मध्ये मंजूर आहे. व महापालिका आकृतीबंधात उद्यान निरिक्षक हे पद प्रस्तावित केले आहे. त्यामुळे श्रेणी, पदनाम तसेच शैक्षणिक अर्हता व |
| | | | पदोन्नती 100% | --- | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण केलेल्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे उद्यान सहाय्यक या संवर्गात किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक. | | | पदोन्नती १००% | - | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उदयान निरीक्षक या संवर्गात किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक | |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | | | | | | | पात्रतेत बदल करणे आवश्यक आहे. |
| 57. | श्रेणी- 3 उद्यान सेवा | उद्यान सहाय्यक | नामनिर्देशन 75% | 33 वर्षे | मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स)/अॅग्रीकल्चर्स/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/मान्यता प्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | श्रेणी- 3 उद्यान सेवा | उद्यान निरीक्षक | नामनिर्देशन (सरळसेवा) ७५% | 38 वर्षे | शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स)/अॅग्रीकल्चर्स/ बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण | महानगरपालिका आकृतीबंधामध्ये उद्यान निरिक्षक या पदनामाचे पद प्रस्तावित केले आहे. त्यामुळे पदोन्नतीच्या अर्हतेत बदल करणे आवश्यक आहे. |
| | | | पदोन्नती 25% | --- | महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे प्रमुख माळी या संवर्गात 05 वर्षाचा अनुभव आवश्यक. | | | पदोन्नती २५% | - | अ) राज्य शासनाची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>ब) कृषि / उद्यान विद्या यातील पदवीका.<br>क) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे हेड माळी या संवर्गात ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. | |
| 58. | श्रेणी- 4 उद्यान सेवा | प्रमुख माळी | नामनिर्देशन | 33 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) माळी व्यवसायाचा 1 वर्षाचा कृषी विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम पूर्ण. | श्रेणी- 3 उद्यान सेवा | हेड माळी | नामनिर्देशन (सरळसेवा) ५०% | 38 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) माळी व्यवसायाचा १ वर्षाचा कृषी विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम पूर्ण. | मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर श्रेणी-03 मध्ये हेडमाळी हे पद मंजूर आहे. |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | पदोन्नती | | अ) इयत्ता 7 वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे माळी या पदावर किमान 5 वर्षांचा अनुभव आवश्यक. | | | पदोन्नती ५०% | | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे माळी/चतुर्थ श्रेणी कर्मचारी या संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधुन पदोन्नतीने नेमणुक | त्यामुळे श्रेणी, पदनाम तसेच पदोन्नतीच्या अर्हतेत बदल करणे आवश्यक आहे. |
| 63. | श्रेणी- 3 प्रशासकीय सेवा | उप समाज कल्याण अधिकारी / वैद्यकीय समाजसेवक | नामनिर्देशन | 40 वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे समाज शास्त्र शाखेची पदवी.<br>ब) बी. एस. डब्ल्यु परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>क) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील समाज सेवक या पदावरील किमान 05 वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. | श्रेणी- 3 प्रशासकीय सेवा | सहाय्यक समाज विकास अधिकारी | नामनिर्देशन (सरळसेवा) ५०% | 38 वर्षे | अ) शासनमान्य विद्यापीठाचे समाज शास्त्र शाखेची पदवी.<br>ब) बी. एस. डब्ल्यु परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>क) शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील समाज सेवक या पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. | मिरा महानगरपालिका आस्थापनेवर उप समाज कल्याण अधिकारी/ वैद्यकीय समाज सेवक या पदनामाचे पद मंजूर नसुन नविन आकृतीबंधामध्ये सहाय्यक समाज विकास अधिकारी (श्रेणी-03) हे पद प्रस्तावित केले आहे. तसेच पदोन्नतीसाठी समाज सेवक या पदाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | --- | नामनिर्देशनामध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे समाज सेवक या संवर्गातील 5 वर्षांचा अनुभव आवश्यक. | | | पदोन्नती ५०% | - | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे **वरिष्ठ लिपीक** या सवर्गात किमान ०५ वर्षांचा अनुभव. | |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | | | | | | | आवश्यक आहे. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर समाज सेवक हे पद मंजूर नाही. त्यामुळे वरिष्ठ लिपीक या पदाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे बदल करणे आवश्यक आहे. |
| 88. | श्रेणी- 3 तांत्रिक सेवा | नळ कारागीर (प्लंबर / फिटर/ मीटरवाचक) | नामनिर्देशन | 33 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण. आणि<br>ब) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) संबंधित कामाचा 3 वर्षाचा अनुभव. | श्रेणी- 3 तांत्रिक सेवा | नळ कारागीर (प्लंबर / फिटर/ मीटरवाचक) | नामनिर्देशन (सरळसेवा) ५०% | 38 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण. आणि<br>ब) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) संबंधित कामाचा ३ वर्षाचा अनुभव. | पदोन्नतीसाठी सहाय्यक नळ कारागीर या पदाचा अनुभव आवश्यक आहे. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक नळ कारागीर हे पद मंजूर नसुन, वॉल्व्हमन व पंपमदतनीस ही पदे |
| | | | पदोन्नती | --- | महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे सहाय्यक नळ कारागीर या पदावरील कामकाजाचा 05 वर्षांचा अनुभव. | | | पदोन्नती ५०% | - | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे **वॉल्वमन/पंप मदतनीस** या संवर्गात ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. | |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | | | | | | | मंजूर आहेत. त्यामुळे बदल करणे आवश्यक आहे. |
| 185. | श्रेणी- 2 निम वैद्यकीय सेवा | सहाय्यक मेट्रन | नामनिर्देशन | 33 वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी (नर्सिंग) या विषयाची पदवी.<br>ब) पदव्युत्तर पदवी उमेदवारास प्राधान्य.<br>क) सहाय्यक अधिसेविका या पदावरील शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था मान्यवर रुग्णालयातील 5 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. किंवा<br>अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका<br>क) सिस्टर इंन चार्ज/नाईट सुपरवाईजर म्हणून शासकीय / निमशासकीय खाजगी रुग्णालयातील 7 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | श्रेणी- 2 निम वैद्यकीय सेवा | सहायक अधिसेविका | नामनिर्देशन | 38 वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी (नर्सिंग) या विषयाची पदवी.<br>ब) पदव्युत्तर पदवी उमेदवारास प्राधान्य.<br>क) सहायक अधिसेविका या पदावरील शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था मान्यवर रुग्णालयातील 5 वर्षाचा अनुभव.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>किंवा<br>अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका. | मिरा भाईंदर महनगरपालिका आस्थापनेवर श्रेणी-02 या संवर्गात सहायक अधिसेविका पद मंजूर आहे. त्यामुळे पदनामात बदल करणे आवश्यक आहे. तसेच नेमणूकीच्या अर्हतेमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी ची विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | | | | | | क) सिस्टर इनचार्ज/नाईट सुपरवाईजर म्हणुन शासकीय/ निमशासकीय खाजगी रुग्णालयातील 07 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | विहित करण्यात आलेली इतर अर्हता धारण करत असलेले कला व वाणिज्य शाखेतील परिक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी नामनिर्देशन/पदोन्नती पासून वंचीत राहत आहेत. त्यामुळे बदल करणे आवश्यक आहे. |
| | | | पदोन्नती | --- | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सिस्टर इन चार्ज/ नाईट सुपरवाईझर संवर्गातील सेवेचा किमान 7 वर्षाचा अनुभव आवश्यक. | | | पदोन्नती | - | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुण्वत्ता यांच्या आधारे सिस्टर इनचार्ज/नाईट सुपरवाईजर संवर्गातील सेवेचा किमान 07 वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| 186. | श्रेणी- 2 निम वैद्यकीय सेवा | सिस्टर इनचार्ज/ नाईट सुपरवाईजर | पदोन्नती 100% | --- | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका<br>क) शासकीय/ निमशासकीय खाजगी रुग्णालयातील स्टाफ नर्स/नर्स मिडवाईफ म्हणून महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे 7 वर्षाचा | श्रेणी- 3 निम वैद्यकीय सेवा | परिसेविका | पदोन्नती १००% | - | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवायफरी या विषयाची पदविका.<br>क) महापालिका आस्थापनेवर ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे अधिपरिचारीका या पदाचा ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक. | मिरा भाईंदर महनगरपालिका आस्थापनेवर श्रेणी-03 या संवर्गात परिसेविका पद मंजूर आहे. त्यामुळे पदनामात बदल करणे आवश्यक आहे. तसेच पदोन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | | | | | ड) महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलची नोंदणी आवश्यक. | माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी ची विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे पदोन्नतीसाठी विहित करण्यात आलेली इतर अर्हता धारण करत असलेले कला व वाणिज्य शाखेतील परिक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी पदोन्नती पासून वंचीत राहत आहेत. त्यामुळे बदल करणे आवश्यक आहे. |
| 187. | श्रेणी- 2 निम वैद्यकीय सेवा | सार्वजनिक आरोग्य परिचारीका | नामनिर्देशन | 33 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 ची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची | श्रेणी- 3 निम वैद्यकीय सेवा | परिचारिका | नामनिर्देशन (सरळसेवा) ५०% | 38 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवायफरी या विषयाची पदविका. | मिरा भाईंदर महनगरपालिका आस्थापनेवर श्रेणी-03 या संवर्गात परिचारिका पद मंजूर |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | पदविका.<br>क) पब्लिक हेल्थ नर्सिंग या विषयाचा शासन मान्य अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाण पत्र.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>इ) असा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परिचारिका म्हणून 3 वर्षाचा अनुभव आवश्यक. | | | | | क) पब्लिक हेल्थ नर्सिंग या विषयाचा शासन मान्य अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाण पत्र.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>इ) असा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परिचारिका म्हणून ३ वर्षाचा अनुभव आवश्यक | आहे. त्यामुळे पदनामात बदल करणे आवश्यक आहे. तसेच पदोन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी ची विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे पदोन्नतीसाठी विहित करण्यात आलेली इतर अर्हता धारण करत असलेले कला व वाणिज्य शाखेतील परिक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी पदोन्नतीपासून वंचीत राहत आहेत. त्यामुळे बदल करणे आवश्यक आहे. |
| | | | पदोन्नती | --- | महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे नर्स मिडवाईफ संवर्गातील किमान दोन वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व सार्वजनिक आरोग्य शुश्रुषा विद्यालय, नागपूर येथील पब्लिक हेल्थ नर्सिंग अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांमधून 3 वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नती. | | | पदोन्नती ५०% | - | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे अधिपरिचारीका या संवर्गातील किमान ०२ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या व सार्वजनिक आरोग्य शुश्रषा विद्यालय नागपुर येथील पब्लिक हेल्थ नर्सिंग अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या कर्मचा-यांमधुन ०३ वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नती. | |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| 188. | श्रेणी- 3 निम वैद्यकीय सेवा | स्टाफ नर्स/ नर्स मिडवाईफ (G.N.M.) | नामनिर्देशन 75% | 33 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 ची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>क) शासकीय/निमशासकीय खाजगी रुग्णालयातील परिचारिका म्हणून 3 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | श्रेणी- 3 निम वैद्यकीय सेवा | अधिपरिचारीका | नामनिर्देशन (सरळसेवा) ७५% | 38 वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 ची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>क) शासकीय/निमशासकीय खाजगी रुग्णालयातील परिचारिका म्हणून 3 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | मिरा भाईंदर महनगरपालिका आस्थापनेवर श्रेणी-03 या संवर्गात अधिपरिचारीका पद मंजूर आहे. त्यामुळे पदनामात बदल करणे आवश्यक आहे. तसेच पदोन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी ची विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे पदोन्नतीसाठी विहित करण्यात आलेली इतर अर्हता धारण करत असलेले कला व वाणिज्य शाखेतील परिक्षा उत्तीर्ण झालेले |
| | | | पदोन्नती 25% | --- | नामनिर्देशनामध्ये विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रसविका व तत्सम पदावरील किमान 03 वर्षाचा अनुभव. | | | पदोन्नती २५% | - | नामनिर्देशनामध्ये विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रसविका व तत्सम पदावरील किमान 03 वर्षाचा अनुभव. | |

| शासनाने मंजूर केलेले मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 | | | | | | प्रस्तावित बदल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवा नियमातील अ.क्र | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | नामनिर्देश नाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | |
| | | | | | | | | | | | कर्मचारी पदोन्नतीपासून वंचीत राहत आहेत. त्यामुळे बदल करणे आवश्यक आहे. |

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम -2014 मध्ये वरील प्रमाणे केलेल्या दुरुस्तीस मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(विजयकुमार म्हसाळ)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा सभा दि. १९ / ०१ / २०१९

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- १३५

**विषय : आरक्षण क्र. २१७ मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले दवाखाना व मॅटरनिटी होम चालु करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मौजे गोडदेव स.क्र./हि.क्र. नवीन २६/४, २७/५, २४/३ जुना ३३४/४, ३३१/५, ३३८/३ या जागेमधील आ.क्र. २१७ (दवाखाना व प्रसुतिगृह) या नियोजित बांधकामास मे. सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना बांधकाम प्रारंभपत्र देण्यात आले आहे. बांधकाम प्रारंभपत्रातील अटीनुसार नियोजित इमारतीतील २५% बांधकाम क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावयाचे आहे. दि. ०७/०७/२०१८ रोजी झालेल्या नोंदणीकृत करारनाम्यानुसार मे. सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदर इमारतीतील ४३३.०८ चौ. मी. क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या सदर क्षेत्रामध्ये नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह सुरु करावयाचे आहे.

महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या बांधकाम क्षेत्रामध्ये तळमजल्यावर नागरी आरोग्य केंद्र तसेच पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर प्रसुतिगृह चालू करणे प्रस्तावित आहे.जागेची उपलब्धता पाहता सदर ठिकाणी पंधरा खाटांचे प्रसुतिगृह सुरु करण्यात येईल.

नागरी आरोग्य केंद्र चालू करण्यासाठी तळमजल्याच्या जागेमध्ये आवश्यक अंतर्गत बदल (ज्यामध्ये रुग्णतपासणी कक्ष, स्टाफ रुम, लसीकरण कक्ष, औषधवाटप कक्ष, प्रयोगशाळा इ. स्थापन करणे अंतर्भूत आहे) करणे आवश्यक आहे. तसेच प्रसुतिगृहासाठी एक प्रसुतिकक्ष व शस्त्रक्रियागृह तयार करणे आवश्यक आहे.

प्रसुतिगृहासाठी उद्वाहनाची आवश्यकता असून त्याची उपलब्धता करुन द्यावी लागणार आहे. याशिवाय गरजेनुसार आवश्यक ते बांधकाम विषयक बदल / कामे सदर ठिकाणी करावी लागणार आहे.

नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह चालू करणेकामी उपकरणे, साहित्य, खाटा, शस्त्रक्रियागृहाकरीता लागणारे साहित्य, उपकरणे, इ. उपलब्ध करुन द्यावी लागणार आहेत. सदर कामी अंदाजित रु. ३०,००,००० एवढा खर्च अपेक्षित आहे.

नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहासाठी आवश्यक फर्निचर, कपाटे, इ. साठी रु.२५,००,०००, उद्वाहन व्यवस्थेसाठी रु.३०,००,००० व विद्युतविषयक कामांसाठी रु.८,९७,६८० असा एकूण रु.६३,९७,६८० एवढा खर्च अपेक्षित आहे.

नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी यांची खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे पदे मंजूर करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | नागरी आरोग्य केंद्रासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी (वेतनश्रेणी) | प्रसुतिगृहासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी (वेतनश्रेणी) |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ५४००) | प्रभारी वैद्यकीय अधिकारी – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ६६००) |
| २. | परिचारिका – ०२ पदे (वेतन बँड ९३००-३४८००-ग्रेड वेतन ४२००) | बालरोग तज्ज्ञ – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ५४००) |
| ३. | औषध निर्माण अधिकारी – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००-ग्रेड वेतन २८००) | भूलतज्ज्ञ – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ५४००) |
| ४. | प्रसविका – ०५ पदे (वेतन बँड ५२००-२०२००-ग्रेड वेतन २४००) | वैद्यकीय अधिकारी -०४ पदे (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ५४००) |
| ५. | लिपिक – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००-ग्रेड वेतन १९००) | परिसेविका – ०१ पद (वेतन बँड ९३००-३४८००-ग्रेड वेतन ४३००) |
| ६. | शिपाई – ०१ पद (वेतन बँड ४४४०-७४४०-ग्रेड वेतन १३००) | अधिपरिचारिका – १२ पदे (वेतन बँड ९३००-३४८००-ग्रेड वेतन ४२००) |
| ७. | | औषध निर्माण अधिकारी – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००-ग्रेड वेतन २८००) |
| ८. | -- | लिपिक – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००-ग्रेड वेतन १९००) |
| ९. | -- | शिपाई – ०१ पद (वेतन बँड ४४४०-७४४०-ग्रेड वेतन १३००) |
| एकूण पदे | ११ | २३ |

नागरी आरोग्य केंद्राच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी अंदाजित रु.४१,८९,२९६ एवढा खर्च व प्रसुतिगृहाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी रु.१,१२,०३,००८ एवढा वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तसेच साफसफाईकरीता ०३ पाळयामध्ये अंदाजे एकूण १५ सफाई कर्मचारी / आया यांची आवश्यकता असून याकरीता रु.४५,००,००० वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तथापि, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अंतर्गत उपलब्ध मनुष्यबळातून नागरी आरोग्य केंद्र चालू करण्यात येत आहे. सदर मालमत्तेची रंगरंगोटी व इतर कामे अंतिम टप्प्यात आहेत.

अशाप्रकारे आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह सुरु करण्यासाठी भांडवली कामांसाठी सुरुवातीच्या एकवेळच्या खर्चापोटी एकूण रु. ९३,८७,६८० खर्च अपेक्षित आहे. तर वेतन व साफसफाई कामांसाठी वार्षिक रु. १,९८,९२,३०४ आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता तयार करण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात याकरीता तरतूद उपलब्ध करण्यात येईल.

सदरचा विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता मा. महासभेपुढे सविनय सादर.

(बालाजी खतगांवकर)
16/1/19
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\All Sadar\Goshvara - Seven Eleven.docx

ou

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि. १९/ १ /2019**

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** (९३३ ) :- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत खालील काम मंजुर करुन सुरु करण्यात आलेले आहे.

1) घोडबंदर ते जैसलपार्क रस्त्याचे बांधकाम व सुधारणा कामे (साखळी क्र. 0.00 मीटर ते साखळी क्र. 1780.00 मीटर) टप्पा-1

सदर रस्त्याच्या कामांसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे भुसंपादन व जमिन अतिक्रमण मुक्त करुन उपरोक्त रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर 60 मीटर रूंदीच्या रस्त्यामधील जागेचे विकास हक्क प्रमाणपत्राव्दारे व खाजगी वाटाघाटीव्दारे भूसंपादन करून संबंधितांना नियमानुसार मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. तरी सदर कार्यवाहीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर) ९/१/१

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-14

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. महासभा दि.१९/०७/२०१९

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.१३४:- हटकेश जंक्शन येथील नाला छेदून केसिंग पाईप एच.डी..डी. पद्धतीने टाकणे व ११५४ मि.मी.,९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

मिरा-भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील हाटकेश या ठिकाणी चार रस्त्यांचे जंक्शन आहे. सदर ठिकाणी मुख्य जलवाहिन्या फुटपाथला लागून आहेत. त्यामुळे रस्ताची रुंदी कमी होत आहे. सदर रस्ताच्या रुंदीकरणाचे काम बांधकाम विभागामार्फत काम प्रस्तावित आहे. त्यामुळे सदर मुख्य जलवाहिन्या नाला छेदून केसिंग पाईप एच.डी..डी. पद्धतीने टाकणे व ११५४ मि.मी.,९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे काम करणे आवश्यक आहे. सदर मुख्य जलवाहिन्या स्थलांतरीत केल्यामुळे संबंधित ठिकाणी असलेले रस्त्याचे चार रस्त्यांचे जंक्शनच्या रुंदी वाढण्यास मदत होणार आहे.

सदर कामी रक्कम रु.१,५४,१६,५८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि.   /   /2019**

**<u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (एक) (के) अन्वये प्रस्ताव</u>**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (   ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आंदोलन कर्त्यांसाठी जागा निश्चित करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात आंदोलन कर्त्यांसाठी जागा निश्चित न केल्याने आंदोलन कर्ते मुख्यालया समोरील फुटपाथ वरील जागेत बसत असल्याने व त्यांना सदर ठिकाणी जागा अपूरी पडत असल्याने त्यांची गैरसोय होत असते. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आंदोलन कर्त्यांसाठी योग्य जागा निश्चित होणेस शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

17/1/19

PC-3/DK/2018-19/MG-16

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि.19/01/2019**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण दोन (एक) (के) अन्वये प्रस्ताव**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (        )** :- राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर खासदार निधी व मनपा निधीतुन फुट ओव्हर ब्रिज बांधणे कामाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर सम्राट हॉटेल, दहिसर चेक नाका येथे फुट ओव्हर ब्रिज बांधण्यासाठी रु.74.93 लक्ष रक्कम मा. श्री. राजन विचारे, लोकसभा सदस्य, यांच्या खासदार निधीतुन मंजुर झालेले आहेत. सदर फुट ओव्हर ब्रिज बांधण्याचा एकुण खर्च रु.2,17,93,000/- एवढा असल्याने मा. महासभा दि.30/01/2016 ठराव क्र.113 अन्वये रु.74.93 लक्ष (सुमारे 75.00 लक्ष) रकमेव्यतिरिक्त रु.1,42,93,000/- एवढा निधी महानगरपालिकेच्या निधीतुन करुन खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिल्यानुसार निविदा प्रक्रीया करुन कंत्राटदार यांना कार्यादेश देण्यात आलेले होते.

दरम्यानच्या काळात राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वरुन मिरा-भाईंदर शहरासाठी मेट्रो प्रकल्प मंजुर झाल्याने सदर फुटओव्हर ब्रीज च्या जागेची तपासणी करणे आवश्यक झाले. मी स्वत: पाठपुरावा करून नाहरकत पत्र घेऊन देतो असे बैठकीत झालेल्या चर्चेत समक्ष सांगितले, त्यानुसार एम.एम.आर.डी.ए. व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना पत्र पाठवून नाहरकत पत्र मागण्यात आले आहे. एम.एम.आर.डी.ए. यांनी पांडुरंगवाडी सम्राट हॉटेल जवळील मेट्रो स्टेशन संपल्यावर (मिरा-भाईंदर कडे) फुट ओव्हर ब्रीज बांधण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

वरील परिस्थिती पहाता खासदार निधी व मनपा निधीतुन मंजुर फुट ओव्हर ब्रिज बांधणेबाबत तसेच खासदार निधी व्यतिरिक्त लागणारा निधी मनपा निधीतुन करावा लागणार असल्याने सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

15/1/19

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2018-19/DK/MG-11

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि.   /   /2019

**(महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण क्र. 02 कलम 1 (के) अन्वये)**

// गोषवारा //

**प्रकरण क्र. :-** **सन 2019 मधील 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासनाच्या सन 2017 ते 2019 या वर्षा मध्ये जुन-जुलै महिण्यात 3 वर्षाच्या कालावधी मध्ये 50 कोटी वृक्ष लागवड करण्याचा उद्दीष्टे आहे. त्यानुसार सन 2019 मध्ये 33 कोटी वृक्ष लागवड करणेकामी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून त्याचे नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करून अमंलबजावणी करण्याबाबत मा.मंत्री, वने व महसूल, यांनी दि.26/06/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तसेच मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष 50 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम, ठाणे, यांनी वृक्ष लागवडीचे यंत्रणानिहाय व कार्यलय निहाय वृक्ष लागवडीचे उध्दिष्ठ वाटप करण्यात आलेले असून मिरा भाईंदर महानगरपालिका करिता एकुण 60 हजार वृक्ष लागवडीचे उध्दिष्ठ देण्यात आलेले असून क्रमांक/33कोवृला/कावि-399/2018 दि.01/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर उध्दिष्टांच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सन 2019 मध्ये मोठया प्रमाणावर कांदळवण (Mangroves) व वनीकरणाच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर शहराला मोठया प्रमाणात सागरी किनारा लाभलेला आहे. सागरी किनारपटटीलागत मोठया प्रमाणात (Mangroves) कांदळवणाची वाढ चांगल्या प्रकारे होते. खा-या पाण्यात सर्वसाधरणपणे भरतीच्या पाण्याच्या पातळीपासुन ते ओहीटीच्या पाण्याच्या पातळीदरम्यान पटटयात ही कांदवळण आढळते. या वनस्पतीची पाने चिवट व हिरवीगार असतात. कांदवळणाची लागवड दलदलयुक्त् क्षार जमीन व दुषित पाणी असेलेल्या ठिकाणी वाढ चांगली होते.

कांदळवण हे जमिन आणि समुद्र यामधील बफर झोनचे काम करत असुन भरती ओहोटीमुळे होणा-या जमिनीची धुप थांबवते. तसेच कांदळवण हे समुद्रातील विविध जातीचे संरक्षण व संवर्धनाचे काम करते व जागतिक तापमान वाढीमुळे होणा-या नैसर्गिक आपत्तीपासुन संरक्षण करण्याचे काम करते.

कांदवळणाच्या दाट झाडीमुळे समुद्र व जमीन तसेच खाडी किनार व त्यावरील प्रदेश यांत एक हिरवी भिंत निर्माण होते त्यामुळे किना-या जवळच्या जमिनीची पाण्यापासनु होणारी धुप थांबते. भुसंरक्षणाच्या दृष्टिने या वनस्पती अतिशय महत्वाच्या आहेत. कांदवळणामुळे (Mangroves) इतर वनस्पती व जीवसृष्टिचे संरक्षण होते. जलचर प्राण्यांना संरक्षण मिळते. मासे,खेकडे,झिंगे वैगरे प्राणी येथे अंडी घालतात पिल्ली मोठी झाली कि समुद्राकडे जातात. कांदवळणाची (Mangroves) वने असलेल्या सर्व ठिकाणी सागरी लाटांपासुन संरक्षण मिळते त्यामुळे ख-या अर्थाने ते तटरक्षकाची भुमिका चोख बजावतात. त्यामुळे जैवविविधते (Bio- Divercity) मध्ये वाढ होते एकंदरीत संपुर्ण जीवन साखळी या भागात आकाराला येऊ शकते त्यासाठी खाडीचा भाग कांदवळणाने समृध्द राहणे आवश्यक आहे. तसेच बॅक वॉटर, खाडी या भागात केवळ कांदवळणाच्या अस्तित्वामुळे किती जैवविविधता असु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालचा सुंदरबन प्रदेश आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवणांची लागवड करुन निगा व देखभाल करणे आवश्यक आहे.

सन 2011 मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना करण्यात आलेली होती त्यानुसार मिरा भाईंदर शहराच्या उत्तर, दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पुर्व भागात कांदवळणाच्या एकुण 10 प्रजातीसह **20.7 $Km^2$ क्षेत्र** कांदवळणाचे आढळुन आलेले असुन सदर ठिकाणी खालीलप्रमाणे कांदवळणाची जाती आढळुन आलेल्या आहेत.

| Sr.no | Botanical Name | Common Name |
|---|---|---|
| 1 | Avicennia marina ( Forsk ) Vierh | Tivar |
| 2 | Excoecaria agallocha . | Huri, Geva, Phungi |
| 3 | Rhizophora mucronata Lamk | Kandal |
| 4 | Avicennia officinalis Linn. | Tivar |
| 5 | Ceriops tagal ( per) C. B. Robinson | Kirkiri |
| 6 | Agiceras corniculatum (L.) Blanco | Sugandha |
| 7 | Sonneratia apetala Buch. Ham | Chipi |
| 8 | Bruguieraq cylindrical ( L.) Bl. | Kandal |
| 9 | Lumnitzera racemosa Wild | -- |

पर्यावरण संरक्षण व प्रदुषण नियंत्रण् कायदा 1986 अन्वये प्रदुषणमुक्त्, आरोग्य पुर्ण जीवन जगणे हा प्रत्येक नागरीकाचा हक्क् आहे. या गोष्टीसाठी पुरक म्हणुन शासनाने विविध कायदे केले असुन त्या सर्वाचा समावेश करणारा पर्यावरण (संरक्षक) अधिनियम 1986 हा अतिशय महत्त्वपुर्ण असा कायदा आहे.

कांदळवणाचे संरक्षण् व संवर्धन करण्यासाठी मा. उच्च् न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. 3246/04 मध्ये दिनांक 06/10/2005 रोजी आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंघाने महाराष्ट्र शासनाने, दि. 21/10/2005 रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. तसचे कांदळवण संवर्धनाबाबत मा. उच्च् न्यायालयाने वेळोवेळी आदेश पारित केले आहेत.

सन 2018 -19 या आर्थिक वर्षात **"वृक्षारोपन / सामाजिक वनिकरण/निसर्ग उद्यान" / "कांदळवण लागवड"** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सन 2019 मधील 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणेकामी निविदा मागविणे व त्याकामी येणाऱ्या कामाच्या रु. 1.00 कोटी खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 9 U/09/o 9९ वेळ 02:30 at
प्रा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. ...e3... वर्ष :- 2096-9९

9U/09/2099

**लिपीक**
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ ९८८ /२०१८-१९ दिनांक :- ११ /०२/२०१९.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा शनिवार दि. १९/०१/२०१९ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत प्रकरण क्र. ११२ ते १३५ व कलम के अन्वये प्राप्त प्रकरण क्र. १३६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **बुधवार, दिनांक १३/०२/२०१९ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17